International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# बी.एड. महाविद्यालयात शिक्षक प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी -शिक्षकांत भारतीय ज्ञान परंपरेबाबत असलेल्या जाणीव जागृतीचा अभ्यास

**डॉ. विजय संतू पाटोळे**
*सहयोगी प्राध्यापक, स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर.*
*Corresponding Author –* **डॉ. विजय संतू पाटोळे**
**DOI - 10.5281/zenodo.18710134**

***सार (Abstract):***

*भारतीय ज्ञान परंपरा ही विश्वाच्या सर्वात प्राचीन आणि समग्र ज्ञानप्रणाली आहे, जी वेद, उपनिषद आणि शास्त्रांद्वारे सतत प्रवाहित होत आली आहे. या परंपरेत जीवनाचे प्रत्येक पैलू – धर्म, विज्ञान, कला आणि नीतिशास्त्र – एकत्रितपणे समाविष्ट आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ने या वारशाचे संरक्षण आणि आधुनिक शिक्षणात समावेश करण्यावर भर दिला आहे, ज्यामुळे आत्मनिर्भर भारताचे स्वप्न साकार होईल. भारतात आज अनेक कैक रूढी, चालीरीती परंपरागत चालत आलेल्या आहेत, त्या कुठेही लिहून ठेवलेल्या नसतात किंवा त्यांचे जतन केले जात नाही त्या ग्रंथित केलेल्या नसतात. आजही पारंपरिक ज्ञान काही भाग सूत्र रूपाने, सिद्धांत रूपाने ग्रंथित केला गेला आहे. त्या ग्रंथांमधून विविध शास्त्र, विज्ञान किंवा तत्त्वज्ञान सांगितले आहे. या ग्रंथबद्ध ज्ञानाला 'भारतीय ज्ञान संस्था' असे म्हटले जाते. ही ज्ञानपरंपरा अतिशय प्राचीन आहे. आणि तिचा ओघ अखंड वाहत आहे. अशा ज्ञान परंपरा इतरही प्राचीन संस्कृतींमध्ये होत्या. जसे इजिप्त, सुमेरियन, ग्रीक, बेबिलोनियन, पर्शियन इत्यादी. मात्र, त्या परंपरा काळाच्या ओघात व आक्रमणांच्या माऱ्यात नष्ट झाल्या. भारतीय ज्ञान परंपरा मात्र अनेक आघात सहन करूनसुद्धा आजही टिकून आहे. त्या अर्थी त्यामध्ये निश्चितपणे काही शाश्वत असे तत्त्व असणार. तसे नसते तर ते ज्ञान हजारो वर्षे टिकले नसते. ते ज्ञान टिकले तर आहेच, पण विशेष असे की, ते आजही वाचावेसे वाटते. त्या अर्थी ते नित्यनूतन आहे. प्रत्येक वाचनात त्यामधील काही नवीन अर्थ कळतो. या २१ व्या शतकात आपण सर्वजण हे सर्व शिकत आहोत आणि पुढील पिढीला त्याचा विसर पडता कामा नये म्हणून भारतीय ज्ञान परंपरेचे जतन आणि उत्तम संवर्धन करणे काळाची गरज आहे. सदर संशोधन लेखात भविष्यात शिक्षक म्हणून सेवेत येणाऱ्या विद्यार्थी-शिक्षकांत भारतीय ज्ञान परंपरा बाबत किती जाणीव आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.*

***मुख्य शब्द (Keywords): भारतीय ज्ञान परंपरा, वेद, शास्त्र, संस्कृती, तत्वज्ञान, कला, नैतिकता, आयुर्वेद, विद्यार्थी-शिक्षक.***

**प्रस्तावना:**

भारतीय ज्ञान प्रणाली ही प्राचीन काळापासून विविध क्षेत्रांमध्ये प्रगतीशील राहिलेली एक अद्वितीय परंपरा आहे. मानव जीवनाच्या सर्व अंगांचा समावेश असलेल्या या प्रणालीत वेद, उपनिषदे, तत्त्वज्ञान, आयुर्वेद, योग, ज्योतिष, वास्तुशास्त्र, काव्य, आणि विज्ञान अशा अनेक विषयांचा समावेश आहे. या ज्ञान परंपरेने केवळ भारतालाच नव्हे, तर जगाला ज्ञान, तत्वज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा अमूल्य ठेवा दिला आहे. भारतीय संस्कृतीचा आणि

जीवनशैलीचा सार समजून घेण्यासाठी भारतीय ज्ञान प्रणालीचा अभ्यास महत्त्वपूर्ण ठरतो.

हजारो वर्षांच्या प्रगल्भ इतिहासातून ही प्रणाली विकसित झाली असून, आजच्या काळातही तिचे महत्त्व अबाधित आहे. भारताच्या प्राचीन ऋषी-मुनींनी मानवी जीवन, जग, ब्रह्मांड याबद्दल जे गहन विचार मांडले, ते आजही मानवाच्या जीवनात मार्गदर्शक ठरतात.

**भारतीय ज्ञान प्रणालीचे स्वरूप:**

भारतीय ज्ञान प्रणाली ही अत्यंत व्यापक आणि विविधतेने नटलेली आहे. ती जीवनाच्या सर्व अंगांचा विचार करणारी प्रणाली आहे, ज्यामध्ये शारीरिक, मानसिक, बौद्धिक, नैतिक आणि आध्यात्मिक उन्नतीचा समावेश आहे. या प्रणालीचे स्वरूप विविध शाखांमध्ये विभागलेले आहे, जसे की

**1. वेद आणि तत्त्वज्ञान:** भारतीय ज्ञानाचे मूळ वेदांमध्ये आढळते. वेद, उपनिषदे, आणि तत्त्वज्ञानाच्या ग्रंथांमध्ये सृष्टी, आत्मा, आणि परमात्मा यांचे गहन विचार मांडले आहेत. अद्वैत, द्वैत, सांख्य, योग, न्याय, वैशेषिक यांसारख्या तत्त्वज्ञानाच्या शाळांनी मानवी अस्तित्वाबद्दल विविध दृष्टिकोन दिले आहेत.

**2. आयुर्वेद आणि योग:** भारतीय आरोग्य शास्त्रातील आयुर्वेद आणि योग या दोन महत्त्वाच्या प्रणालींमध्ये शारीरिक आणि मानसिक आरोग्याचा समतोल साधण्याचे मार्गदर्शन आहे. आयुर्वेद शारीरिक उपचारांवर भर देतो, तर योग मानसिक शांती आणि शारीरिक फिटनेस वाढवतो.

**3. वास्तुशास्त्र आणि ज्योतिष:** वास्तुशास्त्र आणि ज्योतिष हे भारतीय जीवनशैलीशी निगडीत विज्ञान आहेत. वास्तुशास्त्रात पर्यावरणाशी संतुलन राखून वास्तू बांधण्याचे तत्त्वज्ञान आहे, तर ज्योतिष जीवनातील घटनांचे ग्रह-नक्षत्रांशी असलेले संबंध स्पष्ट करते.

**4. गणित आणि खगोलशास्त्र:** प्राचीन भारतातील विद्वानांनी गणित आणि खगोलशास्त्रात महत्त्वपूर्ण शोध लावले. शून्याचा शोध, त्रिकोणमिती, भूमिती यांचे अध्ययन भारतीय गणिती परंपरेचा भाग आहे. आर्यभट, भास्कराचार्य यांसारख्या गणितज्ञांनी खगोलशास्त्रात मोठी प्रगती केली.

**5. कला आणि साहित्य:** भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये नाट्यशास्त्र, काव्यशास्त्र, संगीतशास्त्र यांचे महत्त्व आहे. भारतीय कलेमध्ये नाटक, नृत्य, संगीत यांचा समावेश असून, त्यांच्यात सौंदर्य आणि तात्त्विक विचारांचे प्रतिबिंब दिसते.

**6. नीतिशास्त्र आणि समाजशास्त्र:** नीतिशास्त्र आणि समाजशास्त्राच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीत नैतिकता, धर्म, कर्तव्य, आणि समाजातील माणसाचे स्थान या विषयांचा विचार केला गेला आहे. धर्मशास्त्रे, स्मृतीग्रंथ आणि विविध नीतिग्रंथ यांतून समाज व्यवस्थेचे तत्त्वज्ञान मांडले आहे.

**भारतीय ज्ञान प्रणालीची गरज:**

आजच्या वेगवान, ताणतणावग्रस्त आणि भौतिकवादी जीवनशैलीमध्ये भारतीय ज्ञान प्रणालीची गरज अधिक महत्त्वाची ठरते. भारतीय ज्ञान परंपरा केवळ भौतिक किंवा वैज्ञानिक प्रगतीवरच नाही तर मानसिक, शारीरिक, नैतिक, आणि आध्यात्मिक उन्नतीवरही भर देते. तिची गरज खालील कारणांसाठी आहे:

**1. मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्य:** आजच्या धकाधकीच्या जीवनात लोक मानसिक ताण, चिंता आणि शारीरिक समस्यांना सामोरे जात आहेत. योग, ध्यान, आणि आयुर्वेद यांसारख्या भारतीय ज्ञान प्रणालींमुळे मानसिक शांती आणि शारीरिक तंदुरुस्ती मिळवणे शक्य होते. आयुर्वेदातील नैसर्गिक उपाय आणि योगाच्या साधनांमुळे आरोग्याची समग्र देखरेख करता येते.

**2. नैतिकता आणि मूल्यशिक्षण**: भारतीय ज्ञान प्रणालीत नैतिकता, कर्तव्य, धर्म, आणि समाजसेवा यांवर विशेष भर दिला आहे. आधुनिक जीवनात नैतिकतेची हानी आणि स्वार्थी विचारसरणी वाढत आहे. अशा परिस्थितीत गीता, उपनिषद आणि इतर तत्त्वज्ञानिक ग्रंथांमधील शिकवणी समाजात नैतिकता आणि सदाचार निर्माण करण्यासाठी उपयुक्त ठरू शकते.

**3. पर्यावरण संतुलन**: भारतीय तत्त्वज्ञानात निसर्गाशी संतुलित जीवन जगण्यावर भर दिला आहे. पर्यावरणीय समस्या, प्रदूषण, आणि नैसर्गिक साधनसंपत्तींचे अवमूल्यन वाढत असताना, भारतीय वास्तुशास्त्र, पंचमहाभूत, आणि आयुर्वेदातील शिकवणींमुळे निसर्गाशी समरस होण्याचे मार्गदर्शन मिळते.

**4. आध्यात्मिक उन्नती**: जीवनातील आनंद, समाधान, आणि शांती यांचा शोध माणूस सदैव घेत असतो. भारतीय ज्ञान परंपरा आत्मज्ञान, मोक्ष, आणि ध्यान यांसारख्या संकल्पनांमधून आत्मिक उन्नतीचे मार्ग दाखवते. या तत्त्वज्ञानांमुळे मानवाच्या जीवनाला एक ध्येय आणि दृष्टी प्राप्त होते.

**5. शाश्वत विकास**: आधुनिक जगात भौतिक विकासावर भर दिला जात असला तरी, तो टिकाऊ नाही. भारतीय तत्त्वज्ञानात शाश्वत विकासाचे मार्गदर्शन आहे, जिथे संसाधनांचा विवेकपूर्ण वापर, मानव आणि निसर्ग यांच्यात संतुलन राखणे महत्त्वाचे मानले जाते.

**6. सर्वसमावेशक शिक्षण**: भारतीय ज्ञान प्रणाली फक्त एका क्षेत्रापुरती मर्यादित नाही, ती जीवनाच्या सर्व पैलूंवर विचार करते. शिक्षणाच्या सर्वांगीण विकासासाठी ही प्रणाली उपयुक्त ठरते. शारीरिक, मानसिक, बौद्धिक, आणि आध्यात्मिक उन्नतीसाठी भारतीय शिक्षण पद्धती महत्त्वाची ठरते.

**भारतीय ज्ञान परंपरेचे महत्व:**

भारतीय ज्ञान प्रणालीचे महत्त्व त्याच्या प्राचीन, व्यापक आणि सर्वसमावेशक दृष्टिकोनात आहे. जीवनाच्या प्रत्येक अंगाचा समतोल विचार करणारी ही प्रणाली शारीरिक, मानसिक, सामाजिक, नैतिक, आणि आध्यात्मिक उन्नतीसाठी मार्गदर्शक ठरते. तिचे महत्त्व खालीलप्रमाणे आहे.

**1. आध्यात्मिकता आणि तत्त्वज्ञान**: भारतीय ज्ञान प्रणाली मानव जीवनाचे अंतिम ध्येय आत्मज्ञान आणि मोक्ष प्राप्ती मानते. उपनिषद, भगवद्गीता, वेद, आणि इतर तत्त्वज्ञान ग्रंथांमधील शिकवण माणसाला जीवनातील गहन प्रश्नांवर विचार करण्यास आणि जीवनाच्या उद्दिष्टांचा शोध घेण्यास प्रोत्साहित करते.

**2. योग आणि आयुर्वेदाच्या माध्यमातून आरोग्य**: भारतीय ज्ञान परंपरेतील योग आणि आयुर्वेद हे दोन महत्त्वाचे घटक आहेत, ज्यांनी शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्व मिळवून दिले आहे. योगाने मन, शरीर आणि आत्मा यांचा समतोल साधण्यास मदत होते, तर आयुर्वेद शारीरिक उपचारांवर आधारित एक शाश्वत आरोग्य प्रणाली आहे.

**3. शाश्वतता आणि निसर्गाशी संतुलन**: भारतीय तत्त्वज्ञानात निसर्गाशी समरसून जीवन जगण्यावर भर दिला आहे. आजच्या काळात पर्यावरणीय समस्या वाढत असल्यामुळे, भारतीय ज्ञान प्रणालीतील निसर्गाचे महत्त्व आणि त्याबरोबर जगण्याचे तत्त्वज्ञान अत्यंत महत्त्वाचे ठरते.

**4. नैतिकता आणि सामाजिक जबाबदारी**: भारतीय ज्ञान परंपरेने नेहमीच नैतिकता, धर्म, कर्तव्य, आणि समाजातील जबाबदारी यांचा प्रचार केला आहे. महाभारत, रामायण, धर्मशास्त्रे आणि नीतिग्रंथांमधील शिकवण आजच्या समाजातील नैतिकतेची गरज पूर्णकरण्यासाठी मार्गदर्शक ठरू शकते.

**5. वैज्ञानिक आणि गणितीय योगदानः** भारतीय ज्ञान परंपरेतील गणित, खगोलशास्त्र, आणि विज्ञानातील शोधांनी जागतिक विज्ञान क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. शून्याचा शोध, दशमलव पद्धती, आणि खगोलशास्त्रातील गहन संशोधन भारतीय विद्वानांनी केलेले आहेत, जे आजही वैज्ञानिक प्रगतीला आधार देतात.

**6. शिक्षण प्रणालीचा विकासः** प्राचीन भारतातील विद्यापीठे आणि आश्रम प्रणालींनी शिक्षणाच्या सर्वांगीण विकासाला चालना दिली. नालंदा, तक्षशिला यांसारख्या प्राचीन विद्यापीठांनी शास्त्र, तत्त्वज्ञान, विज्ञान, आणि कलेच्या क्षेत्रात विद्यार्थ्यांना शिक्षण दिले. आजच्या काळातही भारतीय शिक्षण प्रणालीचे हे तत्त्वज्ञान उपयुक्त ठरते.

**7. सांस्कृतिक आणि कलात्मक महत्त्वः** भारतीय ज्ञान परंपरेत नाट्यशास्त्र, काव्यशास्त्र, चित्रकला, संगीत आणि नृत्य यांचे महत्त्व आहे. भारतीय कला आणि संस्कृतीतून मानवी भावनांचे आणि तत्त्वज्ञानाचे उत्तम दर्शन होते, जे मानवी जीवन समृद्ध करते.

**संशोधनाची गरज व महत्व:**

भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये पारंपरिक ज्ञान, तत्त्वज्ञान आणि पद्धतींचा एक विशाल साठा आहे, जो नष्ट होण्याच्या धोक्यात आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. आज ही भारतीय ज्ञान प्रणाली भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाबद्दल अंतर्दृष्टी प्रदान करते, ज्यामुळे आंतर-सांस्कृतिक समजूतदारपणा हा वाढीस लागण्यास मदत होत आहे. आज जगातील सर्व क्षेत्रातील प्रगती होत असली तरी प्रगतीच्या नावाखाली कोठेतरी नुकसाणीस सामोरे जावा लागत आहे. भविष्यातील या सर्व समस्यावर किंवा आव्हानांना सामोरे जाण्यासाठी याचे ज्ञान फायदेशीर ठरणार आहे जे शाश्वत विकास, आरोग्यसेवा आणि पर्यावरण संवर्धनासारख्या समकालीन आव्हानांवर उपाय करू शकते. भारतीय ज्ञान प्रणाली हे एक आंतरविद्याशाखीय क्षेत्र आहे जे विज्ञान, मानव्यविद्या आणि सामाजिक विज्ञान यांना जोडते, ज्यामुळे नाविन्यपूर्ण दृष्टिकोन वाढतात. भारतीय ज्ञान प्रणालीला शिक्षणामध्ये समाविष्ट केल्याने शिक्षण अधिक संबंधित, आकर्षक आणि सांस्कृतिकदृष्ट्या संवेदनशील होऊ शकते. यावरील संशोधन शिक्षण, संस्कृती आणि शाश्वत विकासावरील धोरणांना दिशा देऊ शकते. या द्वारे भारताचा बौद्धिक वारसा पुन्हा मिळवणे, नावीन्य आणि सर्जनशीलतेला चालना देणे, सांस्कृतिक विविधतेला प्रोत्साहन देणे आणि जगामध्ये भारताचा प्रभाव दाखविणे हे महत्वाचे ठरणार आहे. भारतीय समाजाला खऱ्या अर्थाने जर उन्नती करावयाची असेल तर उत्तम शिक्षक निर्माण करणे गरजेचे असून त्यांनाही भारतीय ज्ञान परंपरा माहित असणे हे म्हत्वाचे नाही तर त्या ज्ञानाचा व्यावहारिक जगात वापर करण्याला प्रथम प्राधान्य देणे अपेक्षित आहे. नव्याने शिक्षक प्रशिक्षण घेणारे विद्यार्थी-शिक्षक हे भविष्यातील पिढीला नक्कीच या ज्ञान परंपरेचे संक्रमण करण्यात अग्रेसर राहतील कारण त्यांना भारतीय ज्ञान परंपरेची पूर्ण जाणीव होईल आणि आपल्या कर्तव्याचा त्यांना विसर पडणार नाही म्हणून हा अभ्यास गरजेचा आहे असे दिसून येते.

**संशोधन समस्या विधान :**

"बी.एड. महाविद्यालयात शिक्षक प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी -शिक्षकांत भारतीय ज्ञान परंपरेबाबत असलेल्या जाणीव जागृतीचा अभ्यास करणे".

**संशोधनाची उद्दिष्ट्ये:**

१. विद्यार्थी -शिक्षकांत भारतीय ज्ञान परंपरेबाबत असलेल्या सद्यस्थितीतील ज्ञानाचा अभ्यास करणे.

२. विद्यार्थी -शिक्षकांत भारतीय ज्ञान परंपरेचे जतन व संवर्धन करण्यास प्रोत्साहन देणे.

३. शिक्षक प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी -शिक्षकांत भारतीय ज्ञान परंपरेबाबत बाबत जाणीव-जागृती करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

**गृहीतके** :

१. बी.एड. महाविद्यालयात शिक्षक प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी -शिक्षकांत भारतीय ज्ञान परंपरेबाबत माहिती नाही.

**२.** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांनी बी.एड. अभ्यासक्रमात, द्वितीय सत्रात भारतीय ज्ञान परंपरेतील काही घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

**३.** विद्यार्थी -शिक्षकांना बी.ए. प्रवेशापूर्वी भारतीय ज्ञान परंपरेबाबत पदवी व पदव्युत्तर पदवीत सदर अभ्यास शिकविला गेला नाही.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:**

**व्याप्ती:** सदर संशोधन हे महाराष्ट्र राज्यातील सर्व बी.एड. महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थी-शिक्षकांशी निगडीत आहे.

**मर्यादा:**

१. सदर संशोधन हे बी.एड. महाविद्यालयात शिक्षक प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी शिक्षकांशी संबंधित आहे.

२. सदर संशोधन हे श्रीरामपूर तालुक्यातील बी.एड. महाविद्यालयाशी संबंधित आहे.

३. सदर संशोधन हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे संलग्नित रयत शिक्षण संस्थेचे स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर महाविद्यालयाशी निगडीत आहे.

**संशोधन पद्धती:** सदर संशोधनात वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे

**जनसंख्या** : श्रीरामपूर तालुक्यातील सर्व विद्यार्थी - शिक्षकांचा यात समावेश केलेला आहे.

**न्यादर्श पद्धती** : रयत शिक्षण संस्थेचे स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर या महाविद्यालयातील एकूण प्रवेशित झालेल्या विद्यार्थी-शिक्षकांपैकी ३० शिक्षकांची निवड असंभाव्यतेवर आधारित नमुना निवड पद्धतीमधील सहेतुक पद्धतीने केली आहे.

**माहिती संकलनाची साधने:**


प्रस्तुत संशोधनामध्ये माहितीचे संकलन करण्यासाठी प्रश्नावली या साधनाचा वापर करण्यात आला आहे.

**माहिती विश्लेषणाची साधने:**

प्रस्तुत संशोधनामध्ये माहितीचे विश्लेषण करण्यासाठी शेकडेवारी या सांख्यिकीय साधनाचा वापर केला आहे.

**माहितीचे पृथक्करण, अर्थनिर्वचन**


सदर संशोधन प्रश्नावलीतील निवडक प्रश्नांचे अर्थनिर्वचन खालीलप्रमाणे करण्यात आले आहे.



**विश्लेषण :** वरील कोष्टकावरून असे दिसून येते की,

१) एकूण ३० प्रतिसादकांपैकी २६ जणांना म्हणजेच ८६.७ % विद्यार्थी -शिक्षकांना याबाबत उत्तम ज्ञान आहे.


**अर्थनिर्वचन :** यावरून असा निष्कर्ष की सर्वांना याबाबत पुरेसे ज्ञान सर्व विद्यार्थ्यांना आहे.




**विश्लेषण :** वरील कोष्टकावरून असे दिसून येते की,

१) एकूण ३० प्रतिसादकांपैकी केवळ ६ जणांना म्हणजेच २० % विद्यार्थी -शिक्षकांना मुख्य आधाराबाबत माहिती आहे.

**अर्थनिर्वचन :** यावरून असा निष्कर्ष की २४ जणांना म्हणजेच ८०% विद्यार्थी -शिक्षक याबाबत ज्ञान दिसून येत नाही.





**विश्लेषण :** वरील कोष्टकावरून असे दिसून येते की,

१) एकूण ३० प्रतिसादकांपैकी २५ जणांना म्हणजेच ८३.३% विद्यार्थी -शिक्षकांना उत्तम माहिती आहे.

**अर्थनिर्वचन :** यावरून असा निष्कर्ष की केवळ ५ जणांना म्हणजेच १६.७% विद्यार्थी -शिक्षकांना माहिती नाही.

5. भारतीय ज्ञान प्रणालीतील एक महत्त्वाचा घटक कोणता आहे?
11 / 30 correct responses





**विश्लेषण :** वरील कोष्टकावरून असे दिसून येते की,

१) एकूण ३० प्रतिसादकांपैकी केवळ ११ जणांना म्हणजेच ३६.७% विद्यार्थी -शिक्षकांना महत्वाचा घटक माहित आहे.

**अर्थनिर्वचन :** यावरून असा निष्कर्ष की १९ जणांना म्हणजेच ६३.४% विद्यार्थी -शिक्षकांना याबाबत अल्प माहिती आहे.

6. भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये कोणत्या ग्रंथांचा समावेश आहे?
24 / 30 correct responses





**विश्लेषण :** वरील कोष्टकावरून असे दिसून येते की,

१) एकूण ३० प्रतिसादकांपैकी केवळ २४ जणांना म्हणजेच ८०% विद्यार्थी -शिक्षकांना सर्व ग्रंथाबाबत माहित आहे.

**अर्थनिर्वचन :** यावरून असा निष्कर्ष की ६ जणांना म्हणजेच २०% विद्यार्थी -शिक्षकांना याबाबत अज्ञान आहे.


9. भारतीय ज्ञान प्रणालीला आधुनिक युगात कशाची गरज आहे?
19 / 30 correct responses




**विश्लेषण :** वरील कोष्टकावरून असे दिसून येते की,

१) एकूण ३० प्रतिसादकांपैकी केवळ १९ जणांना म्हणजेच ६३.३% विद्यार्थी -शिक्षकांना ज्ञानाचे संवर्धन बाबत माहित आहे.

**अर्थनिर्वचन :** यावरून असा निष्कर्ष की केवळ ११जणांना म्हणजेच ३६.७% विद्यार्थी -शिक्षकांना याबाबत ज्ञान नाही.




**विश्लेषण :** वरील कोष्टकावरून असे दिसून येते की,

१) एकूण ३० प्रतिसादकांपैकी केवळ ११ जणांना म्हणजेच ३६.७% विद्यार्थी -शिक्षकांना मुख्य वैशिष्ट्ये माहित आहे.

**अर्थनिर्वचन :** यावरून असा निष्कर्ष की १९ जणांना म्हणजेच ६३.४ % विद्यार्थी -शिक्षकांना मुख्य वैशिष्ट्ये माहित नाहीत.

[

**निष्कर्ष:**

१. सर्वात जास्त म्हणजेच ८६.७% विद्यार्थी -शिक्षकांना भारतीय ज्ञान परंपरा विषयी जुजबी माहिती आहे.
२. केवळ २०% विद्यार्थी -शिक्षकांना अनुभव हा भारतीय ज्ञान परंपरेचा मुख्य आधार आहे हे माहिती आहे.
३. सर्वात जास्त म्हणजेच ८३.३% विद्यार्थी -शिक्षकांना कला, तंत्रज्ञान, शास्त्र यात विकास झाला आहे हे माहिती आहे.
४. केवळ ३६.७% विद्यार्थी -शिक्षकांना शास्त्रीय तत्वज्ञान हे भारतीय ज्ञान प्रणालीतील एक महत्त्वाचा घटक आहे माहित आहे.
५. केवळ ४६.७% विद्यार्थी- शिक्षकांना भारतीय ज्ञान प्रणालीचे विचारक स्वामी विवेकानंद यांच्याबाबत माहिती आहे.
६. सर्वात जास्त म्हणजेच ६३.४ % विद्यार्थी -शिक्षकांना भारतीय ज्ञान प्रणालीचे मुख्य वैशिष्ट्ये माहित नाहीत.

**योगदान:**

सदर संशोधनामुळे बी.एड. अभ्यासक्रमात भारतीय ज्ञान परंपरा (वेद, आयुर्वेद, योग) चा व्यावहारिक समावेश वाढवता येईल. तसेच राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० प्रमाणे पारंपरिक ज्ञानाचे जतन साध्य करण्यास सहाय्यभूत ठरेल. निश्चितच भावी विद्यार्थी-शिक्षकांना या क्षेत्रातील ज्ञान वाढविण्यास अधिक संधी मिळतील आणि पुढील पिढीत सदर ज्ञान अतिशय प्रभावीपणे संक्रमित करता येईल.

**शिफारशी :**

१. महाराष्ट्र शासनाने भारतीय ज्ञान परंपरेवर कार्यशाळा, प्रशिक्षण शिबीर आयोजित करावेत.
२. प्रशिक्षणात भारतीय ज्ञान परंपरा याबाबत विशेष शिक्षण द्यावे, व्याख्याने आयोजित करावेत.
३. विविध शैक्षणिक स्तरावर विद्यार्थी व समाजासाठी जागृती मोहिमा राबविण्यात याव्यात.

**संदर्भसूची:**

१. नवीन शैक्षणिक धोरण २०२०, शिक्षण मंत्रालय , भारत सरकार (मराठी आवृत्ती)
२. https://www.education.gov.in/sites/upload_files/mhrd/files/nep/2020/MARATHI.pdf

३. डॉ. बापू पत्रे, भारतीय ज्ञान परंपरा, पुस्तिका ,शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

४. https://www.unishivaji.ac.in/uploads/distedu/2024_2025/slm%202024%20_2025/iks-%20module%201%20(1)%20(2).pdf

५. https://uou.ac.in/downloads/12b/Research-and-Innovation/Research%20Publications/Research%20Paper%201%20-%20Akhilesh%20Singh.pdf

६. https://avc.ycmou.ac.in/self_learning_material/ebook

७. https://www.mahamtb.com/Encyc/2020/8/25/Article-on-Indian-Knowledge-Tradition-by-Dr-Gauri-Mahulikar.html